# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.


---

(प्रसिद्धिपत्रक) दि. १२ डिसेंबर २०१७.

## ठाणे जिल्हा परिषदेसह १० नगरपरिषद, नगरपंचायतींसाठी आज मतदान

### बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एका जागेसाठीदेखील मतदान

मुंबई, दि. १२: ठाणे जिल्हा परिषद व त्यांतर्गतच्या पाच पंचायत समित्या; तसेच १० नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी उद्या (ता. १३) मतदान होत आहे. त्याचबरोबर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एका जागेसह विविध ठिकाणच्या रिक्त पदांच्या पोटनिवडणुकांसाठीदेखील उद्या मतदान होईल. त्यासाठी संपूर्ण यंत्रणा सज्ज झाली आहे, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, ठाणे जिल्हा परिषद व त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांच्या क्षेत्रात एकूण ७ लाख ३ हजार ३७८ मतदार आहेत. त्यात ३ लाख २५ हजार ९३२ महिला, ३ लाख ७७ हजार ४४४ पुरूष; तर २ इतर मतदारांचा समावेश आहे. त्यांच्यासाठी ९३७ मतदान केंद्रांची व्यवस्था केली आहे. जिल्हा परिषदेच्या एकूण ५३ जागा आहेत. त्यातील खोणी निवडणूक विभागाची निवडणूक बिनविरोध झाली आहे. आता ५२ जागांसाठी १५२ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. शहापूर (जागा २८), मुरबाड (१६), कल्याण (१२), भिवंडी (४२) आणि अंबरनाथ (८) या पाच पंचायत समित्यांच्या एकूण १०६ जागांसाठी मतदान होत आहे. त्यासाठी २९७ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

वाशीम जिल्हा परिषदेच्या पांगरी नवघरे निवडणूक विभागाच्या रिक्त पदासाठीदेखील उद्या मतदान होत आहे. या एका जागेसाठी ३ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. त्याचबरोबर चाणजे (उरण), माटणे (दोडामार्ग), काथली खु. (नंदुरबार), किल्लारी (औसा), मलकापूर (अकोला) आणि मार्डी (मारेगाव) या निर्वाचक गणांच्या पोटनिवडणुकांसाठीही उद्या मतदान होईल. या सर्व ठिकाणी १४ डिसेंबर २०१७ रोजी मतमोजणी होईल.

**नगरपरिषदा/ नगरपंचायतींसाठी मतदान**

हुपरी (जि. कोल्हापूर), नंदुरबार, नवापूर (जि. नंदुरबार), किनवट (जि. नांदेड), चिखलदरा (जि. अमरावती) आणि पांढरकवडा (जि. यवतमाळ) या नगरपरिषदा; तसेच वाडा (जि. पालघर), शिंदखेडा (जि. धुळे), फुलंब्री (जि. औरंगाबाद) आणि सालेकसा (जि. गोंदिया) या नगरपंचायतींच्या सदस्यपदांसह अध्यक्षपदाच्या थेट निवडणुकीसाठीदेखील उद्या मतदान होईल. त्याचबरोबर मैंदर्गी (जि. सोलापूर), शहादा (जि. नंदुरबार), अंबाजोगाई (जि. बीड), जिंतूर (जि. परभणी), मंगरूळपीर (जि. वाशीम) आणि एटापल्ली (जि. गडचिरोली) या नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या प्रत्येकी एका रिक्तपदाच्या पोटनिवडणुकीसाठीही उद्या मतदान होत आहे. मतदान होत असलेल्या सर्व ठिकाणी सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, बँका आदींना सुट्टी देण्यात आली आहे.

पालघर जिल्ह्यातील डहाणू आणि जव्हार; तसेच नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा नगरपरिषदेसाठी १७ डिसेंबर २०१७ रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे उद्या मतदान होत असलेल्या वाडा आणि नंदुरबार व नवापूरसह

या दोन जिल्ह्यांतील सर्व सहा नगरपरिषदा/ नगरपंचायतींची मतमोजणी १८ डिसेंबर २०१७ रोजी होईल. अन्य सर्व ठिकाणी १४ डिसेंबर २०१७ रोजी मतमोजणी होईल.

**मुंबईत एका जागेसाठी मतदान**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.२१ च्या रिक्त पदाच्या पोटनिवडणुकीसाठीदेखील उद्या (ता.१३) मतदान होत आहे. त्यासाठी २ उमेदवारांमध्ये सरळ लढत होत आहे. एकूण ४१ हजार ५२ मतदारांसाठी ३२ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे.

**मतदान होत असलेल्या नगरपरिषदा/ नगरपंचायतींसंदर्भातील तपशील**

| नगरपरिषद/ नगरपंचायत | प्रभाग | जागा | उमेदवार | | एकूण मतदार | मतदान केंद्रे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | सदस्यपदासाठी | अध्यक्षपदासाठी | | |
| **हुपरी** | ९ | १८ | ९५ | ५ | २१,७७० | २७ |
| **नंदुरबार** | १९ | ३९ | १११ | ६ | १,००,२६३ | १२६ |
| **नवापूर** | १० | २० | ९५ | ६ | २८,७९१ | ३८ |
| **किनवट** | ९ | १८ | १०८ | ६ | २३,५९३ | ३६ |
| **चिखलदरा** | ८ | १७ | ४२ | ६ | ३,९०६ | ८ |
| **पांढरकवडा** | ९ | १९ | ८२ | ६ | २३,४६३ | ३१ |
| **वाडा** | १७ | १७ | ७९ | ५ | १०,९१८ | १७ |
| **शिंदखेडा** | १७ | १७ | ६९ | ४ | २०,२८९ | २७ |
| **फुलंब्री** | १७ | १७ | ४५ | २ | १४,१२४ | १७ |
| **सालेकसा** | १७ | १७ | ५९ | ५ | २,७१५ | १७ |
| **एकूण** | **१३२** | **१९९** | **१,२२२** | **८४** | **२,४९,८३२** | **३४४** |

०-०-०

(Jagdish More, PRO, SEC)